महाराष्ट्र शासन

<u>अत्यंत तातडीचे</u>

क्रमांक करोना २०२०/प्र.क्र. ५८/आरोग्य ५
सार्वजनिक आरोग्य विभाग
गोकुळदास तेजपाल रुग्णालय आवार
कॉम्प्लेक्स बिल्डिंग, नविन मंत्रालय,
मुंबई-४०० ००१
**दिनांक- ०९.०५.२०२०**

प्रति,

जिल्हाधिकारी ....................................(सर्व)
आयुक्त महानगरपालिका ............................(सर्व)
कार्यकारी आरोग्य अधिकारी, बृहन्मुंबई महानगरपालिका.
उपसंचालक आरोग्य सेवा, परिमंडळे ..................(सर्व)
जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय..............(सर्व)
जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद...............(सर्व)
वैद्यकिय आरोग्य अधिकारी , महानगरपालिका ....... (सर्व)

**विषय:- कोवीड १९ रुग्णांसाठी सुधारीत डिस्चार्ज पॉलिसी**

**संदर्भ:- केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना दिनांक ८/५/२०२०**

केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार कोवीड १९ रुग्णांसाठी निश्चित केलेल्या त्रीस्तरीय संस्थात्मक रचनेनुसार या रुग्णांसाठी सुधारीत डिस्चार्ज पॉलिसी तयार करण्यात आली आहे. ही पॉलिसी रुग्णांच्या लक्षणाच्या स्थितीवर अवलंबून आहे.

(https://www/mohfw.gov.in/pdf/finalGuidanceonMangaementofCovidcasesversion२.pdf)

या सुधारीत धोरणानुसार पुढीलप्रमाणे मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात येत आहेत.

## १) सौम्य, अति सौम्य व लक्षणे नसलेले रुग्ण :-

- सौम्य, अति सौम्य व लक्षणे नसलेल्या ज्या रुग्णांना आरोग्य संस्थांमध्ये दाखल करण्यात आले असेल त्यांची दररोज दोन वेळा शरीराच्या तापमानासाठी आणि पल्स ऑक्सीमिटरद्वारे SpO2 तपासणी करण्यात यावी.
- रुग्णाला लक्षणे सुरु झाल्यापासून ७ व्या, ८ व्या व ९ व्या दिवशी ताप नसल्यास १०व्या दिवशी तपासणी करुन डिस्चार्ज देण्यात यावा.
- **या रुग्णांना डिस्चार्ज करीत असतांना कोवीड विषाणुसाठी प्रयोगशाळा तपासणीची आवश्यकता नाही.**

- डिस्चार्जवेळी रुग्णांना घरी विलगीकरण (Home Isolation ) पुढील ७ दिवसासाठी करणे आवश्यक असल्याच्या सूचना देण्यात याव्यात.
- या रुग्णांना डिस्चार्ज झाल्यानंतर त्यांच्या हातावर ७ दिवसांचा स्टॅम्प लावण्यात यावा.
- या रुग्णांमध्ये दाखल असताना डिस्चार्ज करण्यापूर्वी ऑक्सीजनचे प्रमाण ९५ टक्के पेक्षा कमी आढळून आल्यास रुग्णांना Dedicated COVID Health Centre ला संदर्भीत करण्यात यावे.
- या रुग्णांना त्यांच्यामध्ये पुन्हा ताप,खोकला, श्वास घेण्यास त्रास अशी लक्षणे आढळून आल्यास जवळचे कोवीड केअर सेन्टर अथवा राज्याच्या १०४ टोल फ्री क्रमांक हेल्पलाईनवर अथवा नियंत्रण कक्ष ०२०-२६१२७३९४ येथे संपर्क करण्याबाबत कळविण्यात यावे.
- या रुग्णांचा १४ व्या दिवशी आरोग्य कर्मचा-यांनी दूरध्वनीद्वारे पाठपुरावा करावा व लक्षणे नसल्याची खात्री करावी व तशी नोंद करावी.

## २) मध्यम लक्षणे असलेले रुग्ण :-

जे रुग्ण Dedicated COVID Health Centre (Oxygen beds )मध्ये दाखल करण्यात आलेले आहेत त्यांचे डिस्चार्जसाठी खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

(अ) ज्या रुग्णांना ३ दिवस लक्षणे नाहीत आणि त्यांचे रुम एअरवर ऑक्सीजन सॅचुरेशनचे प्रमाण त्यापुढील चार दिवसांसाठी ९५ टक्के पेक्षा जास्त आहे अशा रुग्णांसाठी खालील मार्गदर्शक सूचना:

- मध्यम लक्षणे असलेल्या रुग्णांची शरिराच्या तपमानासाठी तसेच ऑक्सीजन सॅच्युरेशनसाठी तपासणी करावी.
- ज्या रुग्णांमध्ये ३ दिवसांमध्ये ताप कमी झाला आहे आणि पुढील ४ दिवस त्यांचे रुम एअरवर ऑक्सीजन सॅच्युरेशन प्रमाण ९५ टक्केपेक्षा जास्त असेल त्यांना लक्षणे सुरु झाल्यापासून १० दिवस पूर्ण झाल्यानंतर डिस्चार्ज करण्यांत यावे.

  डिस्चार्ज करताना पुढील बाबींची खात्री करण्यांत यावी:-

  अ) तापासाठीची कोणतीही औषधे न घेता रुग्णाला ताप नसणे
  ब) श्वास घेण्यासाठी त्रास न होणे
  क) ऑक्सीजनचा पुरवठा करण्याची आवश्यकता नसणे

- **या रुग्णांना डिस्चार्ज करताना प्रयोगशाळा तपासणीची आवश्यकता राहणार नाही.**
- डिस्चार्जवेळी रुग्णांना घरी विलगीकरण (Home Isolation ) पुढील ७ दिवसासाठी करणे आवश्यक असल्याच्या सूचना देण्यात याव्यात.
- डिस्चार्जच्या वेळी या रुग्णांना त्यांच्यामध्ये पुन्हा ताप,खोकला, श्वास घेण्यास त्रास अशी लक्षणे आढळून आल्यास कोवीड केअर सेन्टर अथवा राज्याच्या १०४ टोल फ्री क्रमांक हेल्पलाईनवर अथवा नियंत्रण कक्ष ०२० - २६१२७३९४ येथे संपर्क करण्याबाबत कळविण्यात यावे.

ब) ज्या रुग्णांमध्ये ताप ३ दिवसामध्ये कमी झाला नाही आणि ज्यांना ऑक्सीजनचा पुरवठा वरुन करण्याची आवश्यकता आहे अशा रुग्णांमध्ये त्यांची लक्षणे नाहीशी झाल्यानंतर आणि वरुन ऑक्सीजन न लागता ऑक्सीजनचे प्रमाण ९५ टक्के किंवा त्यापेक्षा जास्त ३ दिवस असेल तर डिस्चार्ज करावे.

**३) गंभीर रुग्ण तसेच रोग प्रतिकार शक्ती कमी असलेले रुग्ण (इम्युनो कॉम्प्रमाईज/ एचआयव्ही रुग्ण / ट्रान्सप्लान्ट झालेले रुग्ण / कॅन्सरचे रुग्ण ) :-**

अशा रुग्णांना डिस्चार्ज करीत असतांना मार्गदर्शक सूचना पुढीलप्रमाणे

- रुग्णांमध्ये कोणतीही लक्षणे आढळून न येणे
- RT-PCR पध्दतीने लक्षणे नसलेल्या रुग्णांचा एक नमुना निगेटीव्ह येणे आवश्यक आहे.
- रुग्णाची RT-PCR तपासणी लक्षणे कमी झाल्यानंतर करण्यात यावी.

सर्व रुग्णांना डिस्चार्ज करताना लक्षणे आढळून आल्यापासून डिस्चार्ज करण्यापर्यंतचा कालावधी किमान १० दिवस आहे याची खात्री करण्यांत यावी.

सोबत केंद्रशासनाच्या मार्गदर्शक सूचना दिलेल्या आहेत.

प्रदीप व्यास
9-5-2020
(डॉ. प्रदीप व्यास)
प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
प्रत मा.उपमुख्यमंत्री यांचे सचिव
प्रत मा. मंत्री आरोग्य यांचे खाजगी सचिव
प्रत मा. मुख्य सचिव यांचे उपसचिव
प्रत आयुक्त, आरोग्य सेवा, मुंबई
प्रत संचालक, आरोग्य सेवा मुंबई / पुणे

## सुधारित डिस्चार्ज पॉलिसी
## (कोविड-१९ रुग्ण)

### अतिसौम्य,सौम्य लक्षणे नसलेले *

लक्षणे सुरु झाल्यापासून १० दिवसांनी डिस्चार्ज करावा यासाठी ३ दिवस ताप नसणे आवश्यक आहे.

लक्षणे नसलेल्या रुग्णांना त्यांचे निदान झालेपासून १० दिवस पूर्ण झालेनंतर डिस्चार्ज करावे

### मध्यम लक्षणे असलेले रुग्ण*

३ दिवसांमध्ये ताप कमी होणे आणि $O_2$ प्रमाण ($S_PO_2$ 95%) ४ दिवस रुम एअरमध्ये योग्य असणे

लक्षणे सुरु झाल्यापासून १० दिवसांनी डिस्चार्ज करावा पुढील बाबी आवश्यक
- तापाच्या औषधांशिवाय ताप नसणे
- श्वास घेण्यास त्रास नसणे
- वरुन $O_2$ पुरवठा करण्याची आवश्यकता नसणे

लक्षणे कमी न होणे व वरुन $O_2$ देण्याची आवश्यकता असणे

लक्षणे कमी झाल्यानंतर ३ दिवस आणि $O_2$ चा पुरवठा न करता $O_2$ चे प्रमाण योग्य ($S_PO_2$ 95%) - ४ दिवस

रुग्णांना डिस्चार्ज पुर्वी RTPCR तपासणी करण्याची आवश्यकता नाही

रुग्णांना पुढील ७ दिवस घरी विलगीकरण करण्यांत यावे

### गंभीर रुग्ण**

डिस्चार्ज देण्यासाठी आवश्यक बाबी-
- कोणतीही लक्षणे नसणे
- लक्षणे नसताना १ RTPCR तपासणी निगेटीव्ह असणे

**गंभीर लक्षणे असलेले रुग्ण तसेच यामध्ये immuno compromised. (एचआयव्ही,ट्रान्सप्लांट झालेले रुग्ण,कन्सर रुग्ण यांचा समावेश आहे)

Guidelines-
1.(https://www.mohfw.gov.in/pdf/guidelinesforhomeisolationofverymildpresymptomaticCOVID19cases.pdf)
*रुग्णाचे लक्षणानुसार वर्गीकरण करण्यासाठी
2. (https://www.mohfw.gov.in/pdf/FinalGuidanceonManagementofCovidcasesversion2.pdf)

# Revised Discharge Policy for COVID-19

The revised discharge policy is aligned with the guidelines on the 3 tier COVID facilities and the categorization of the patients based on clinical severity (Available at: https://www.mohfw.gov.in/pdf/FinalGuidanceonMangaementofCovidcasesversion2.pdf)

**1. Mild/very mild/pre-symptomatic cases**

Mild/very mild/pre-symptomatic cases admitted to a COVID Care Facility will undergo regular temperature and pulse oximetry monitoring. The patient can be discharged after 10 days of symptom onset and no fever for 3 days. There will be no need for testing prior to discharge.

At the time of discharge, the patient will be advised to follow the home isolation for further 7 days as per guidelines available at (https://www.mohfw.gov.in/pdf/GuidelinesforHomeIsolationofverymildpresymptomaticCOVID19cases.pdf).

At any point of time, prior to discharge from CCC, if the oxygen saturation dips below 95%, patient is moved to Dedicated COVID Health Centre (DCHC).

After discharge from the facility, if he/she again develops symptoms of fever, cough or breathing difficulty he will contact the COVID Care Centre or State helpline or 1075. His/her health will again be followed up through tele-conference on $14^{th}$ day.

**2. Moderate cases admitted to Dedicated COVID Health Centre (Oxygen beds)**

**2.1. Patients whose symptoms resolve within 3 days and maintains saturation above 95% for the next 4 days**

Cases clinically classified as “moderate cases” will undergo monitoring of body temperature and oxygen saturation. If the fever resolve within 3 days and the patient maintains saturation above 95% for the next 4 days (without oxygen support), such patient will be discharged after 10 days of symptom onset in case of:

- Absence of fever without antipyretics
- Resolution of breathlessness
- No oxygen requirement

There will be no need for testing prior to discharge.

At the time of discharge, the patient will be advised to follow the home isolation for 7 days as per guidelines available at https://www.mohfw.gov.in/pdf/GuidelinesforHomeIsolationofverymildpresymptomaticCOVID19cases.pdf).

**2.2. Patient on Oxygenation whose fever does not resolve within 3 days and demand of oxygen therapy continues**

Such patients will be discharged only after

- resolution of clinical symptoms
- ability to maintain oxygen saturation for 3 consecutive days

**3. Severe Cases including immunocompromised (HIV patients, transplant recipients, malignancy)**

Discharge criteria for severe cases will be based on

- Clinical recovery
- Patient tested negative once by RT-PCR (after resolution of symptoms)

